450

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २७/११/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटीएनएस- ३६१५/प्र.क्र.२०२/ भाग-५/पोल-३, दिनांक २६ नोव्हेंबर,२०२४

**विषय :-** सीसीटीएनएस प्रणाली अंतर्गत संगणक व सह सामुग्री यांचे खरेदी करीताची RFP प्रसिध्द करणे व त्याकरीता रक्कम रु.१६१.१७ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

******

महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटीएनएस- ३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दिनांक २६ नोव्हेंबर,२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४११२२६१२१२२१७९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
कार्यासन अधिकारी का .क्र.१७.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त व लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**सीसीटीएनएस प्रणाली अंतर्गत संगणक व सह सामुग्री यांचे खरेदी करीताची RFP प्रसिद्ध करणे व त्याकरीता रक्कम रु.१६१.१७ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३,**
मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६.११.२०२४

**वाचा** :- १) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक:- एमआयएस ०५०८/७४८/प्र. क्र.३२९/पोल-४,दि.२२.०५.२००९.
२) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.१८.९.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त पत्र दि.२७.०९.२०२४
३) पोलीस अधीक्षक (तांत्रिक सेवा), गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे यांचे जा.क्र.सीसीटीएनएस/ हार्डवेअर - RFP/९१३/२०२४, दि.२१.१०.२०२४.
४) ) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), मुंबई यांचे पत्र.क्र.पोमसं/१७/६१६२/ICJS २.० Project/ ५०/२०२४, दि.२४.१०.२०२४.

**<u>प्रस्तावना</u> :-**

केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत सन २०१५ मध्ये राज्यातील १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरिष्ठ पोलीस कार्यालय CAS (Core Application Software) सॉफ्टवेअरव्दारे जोडण्यात आले असून सदर कार्यालयांमध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे दि.१५.०९.२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते लोकार्पण पार पडले आहे. सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जोडण्यात आलेल्या १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरीष्ठ कार्यालयामध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्प हा केंद्र पुरस्कृत होता परंतु मार्च २०१८ नंतर या प्रकल्पास केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होणार नाही, असे केंद्र शासनाने कळविले आहे. सबब सदर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींकरीता येणारा खर्च राज्य शासनामार्फत करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि.१८.९.२०२४ च्या राज्य शिखर समिती (SAC) च्या बैठकीत सीसीटीएनएस प्रणाली अंतर्गत संगणक व सह सामुग्री यांचे खरेदी करीताची RFP प्रसिद्ध करणे व त्याकरीता रक्कम रु.१६१.१७ कोटी निधीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार संगणक व सह सामुग्री खरेदी करणेकरीता तयार करण्यात आलेल्या RFP मध्ये नमूद Desktop, UPS यांचे किंमती पडताळणी करणेकरीता DIT, GoM यांनी Desktop, UPS यांचे specification wise rates चे विश्लेषण केले असून त्यामध्ये Desktop, UPS यांचे किंमतीबाबत कोणताही आक्षेप नसल्याचे नमूद केले आहे, असे गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी संदर्भाधिन क्र.३ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार पोलीस महासंचालक, मुंबई यांनी संदर्भाधिन क्र. ४ येथील दि.२४.१०.२०२४ चे पत्रान्वये व पोलीस अधीक्षक (तांत्रिक सेवा) गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे यांचे संदर्भाधिन क्र. ३ येथील दि.<u>२१.१०.२०२४</u> रोजीचे पत्रान्वये व त्यासोबतचे Appointment of an Agency for Supply, Installation, Commissioning and Maintenance of CCTNS IT Infrastructure (Desktop, UPS Printer, Document Scanner, Network Component, Hard Disk and Miscellaneous Item) Request for Proposal (RFP) प्रसिध्द करणे व त्याकरीता आवश्यक रक्कम रु.१६१.१७ कोटी निधीस मंजूरी मिळून त्याबाबतचा प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u>** :

सीसीटीएनएस प्रणाली अंतर्गत संगणक व सह सामुग्री यांचे खरेदी करीताच्या Appointment of an Agency for Supply, Installation, Commissioning and Maintenance of CCTNS IT Infrastructure (Desktop, UPS Printer, Document Scanner, Network Component, Hard Disk and Miscellaneous Item) Request for Proposal (RFP) प्रसिद्ध करणे व त्याकरीता रक्कम रु.१६१.१७ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ए०९७), ५०- इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५, अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अनु क्र.२७-अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला प्राप्त अधिकारान्वये तसेच मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि.१८.०९.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४११२६१२१२२१७९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.11.26 12:13:18 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि व स), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

१७. प्रकल्प संचालक, मे. विप्रो प्रा.लि., मुंबई.

१८. प्रकल्प संचालक, मे. पीडब्ल्युसी कंपनी, मुंबई.

१९. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.

२०. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.

२१. निवडनस्ती, पोल-३